# उज्ज्वल भारतासाठी नवे शैक्षणिक धोरण!

**व्यापक** सल्ला-मसलतीनंतर तयार केलेले व भारतातील शिक्षणाच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरु शकेल असे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सरकारने मंजूर केले आहे. हे धोरण सर्वंकष व दूरदृष्टीचे असून, देशाच्या भावी विकासात ते महत्वाची भूमिका बजावेल. ही गौरवास्पद कामगिरी यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल २०१६ मध्ये नेमलेल्या टीएसआर सुब्रह्मण्यम व त्यानंतरच्या के. कस्तुरीरंगन समितीचे नक्कीच अभिनंदन करायला हवे.

या धोरणात समग्र व विद्यार्थिकेंद्रित शिक्षणपद्धतीवर दिलेला भर स्वागतार्ह असून, भारताला चैतन्यमय ज्ञानसत्ता बनविणे, हा त्यामागचा उद्देश आहे. एकीकडे भारतीय मातीशी व गौरवाशी घट्ट नाते टिकवून ठेवत दुसरीकडे हे धोरण जगभरातील उत्तम कल्पना व पद्धतींचाही स्वीकार करते. म्हणूनच या धोरणाची दृष्टी जागतिक असूनही ते अस्सल भारतीय आहे. आतापर्यंतच्या प्रवासाचा मागोवा घेऊन पुढील वाटचालीसाठी नवा विचार अनुसरण्याची मागणी जोर धरत असतानाच हे नवे धोरण योग्य वेळी तयार केले आहे. २१व्या शतकाच्या अनुरुप उच्चशिक्षणाकडे पाहण्याची व सर्वांना दर्जेदार प्राथमिक, तसेच माध्यमिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्याची मोठी गरज या धोरणाने पूर्ण होईल. शाळांमधील गळती थांबवून दोन कोटी शाळाबाह्य मुलांना पुन्हा शाळेत आणण्याचे धोरणाचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट आहे, ही समाधानाची बाब आहे.

विद्यार्थ्यांचे व्यवसाय शिक्षण व पर्यावरण शिक्षणाकडे अधिक लक्ष, हाही या धोरणाचा महत्वाचा पैलू आहे. बऱ्याच अर्थी हे धोरण विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य देणारे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सबलीकरण होईल व आवडीचे विषय निवडून ते शिकण्याची त्यांना मुभा मिळेल. वैद्यकीय व कायदा ही क्षेत्रे वगळता अन्य सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी एकच सामाईक नियामक संस्था स्थापण्याने सुशासनाला बळकटी मिळेल. विज्ञान व कला या शाखांचा मिलाफ करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल. संशोधनावर भर, बहुआयामी अध्ययन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व शिक्षकांचा व्यावसायिक दर्जा उंचावणे यामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येतील. मुलांच्या अंगी नीतिमत्ता, तसेच मानवी व संविधानिक मूल्ये





**एम. व्यंकय्या नायडू**
उपराष्ट्रपती

बाणविण्यावर भर दिल्याने सुजाण नागरिकांच्या पिढ्या तयार होतील. शालेय शिक्षण हा शिक्षणाचा पाया असल्याने नव्या धोरणात ३ ते १८ अशा विस्तारित शिक्षणाची मांडणी केली आहे, हेही स्वागतार्ह पाऊल आहे. भारतातील डिजिटल दरीची दखल घेत ती निश्चित काळात भरुन काढण्याचे उद्दिष्टही आहे. किमान अक्षरओळख व आकडेमोड यासाठी राष्ट्रीय मिशन राबविण्याचा हेतूही स्तुत्य आहे. यासोबतच प्रौढशिक्षणाही जोरकसपणे दिल्याने शिक्षित भारत निर्माण होईल. मुलांच्या सर्वंकष विकासात सकस आहाराचे महत्व लक्षात घेऊन माध्यान्ह भोजनाखेरीज शाळेत मुलांना पौष्टिक न्याहरी देण्याची योजना मुलांच्या शिक्षणात मोलाची भर घालेल.

किमान पाचव्या व शक्य तर आठव्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण मातृभाषेत व प्रादेशिक भाषेत देण्याचा या धोरणात मांडलेला विचारही खूप महत्वाचा आहे. जगात ४० टक्के मुलांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षण मिळत नाही, असे 'युनेस्को'चा २०१६ चा अहवाल सांगतो. केवळ पुस्तकी शिक्षणच नव्हे, तर अन्य कला-कौशल्ये आत्मसात करुन सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासास मातृभाषेचे महत्व अनन्यसाधारण आहे. मातृभाषेने मुलांना आत्मविश्वास येतो. ती सर्जनशीलतेने विचार करुन आपले विचार अधिक चांगल्या प्रकारे अभिव्यक्त करु शकतात. मानवी भाव-भावनांची अभिव्यक्ती मातृभाषेतूनच रसदार केली जाऊ शकते. गणित व विज्ञान हे विषयही मातृभाषेतून शिकणे सुलभ जाते, असे तज्ज्ञ सांगतात. मातृभाषेतून शिक्षण घेतलेली मुले इतरांच्या तुलनेत अधिक यश संपादित करतात, असे निष्कर्ष अभ्यास पाहण्यांनी काढलेत. २०१७ पर्यंत 'नोबेल' मिळविणाऱ्या व्यक्ती ज्या देशांत मातृभाषेतून शिक्षण दिले जाते, अशा देशांमधील असल्याचेही दिसते. शिवाय 'ब्लूमबर्ग इनोव्हेशन इंडेक्स' व 'ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स'मध्ये पहिल्या ५० स्थानांवर असलेले देश मातृभाषेत शिक्षण देणारे आहेत, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. महात्मा गांधी व रवींद्रनाथ टागोर यांनी स्वातंत्र्याच्या आधीपासूनच मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरला होता.

मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलांमध्ये साहजिकच प्रादेशिक भाषांतील साहित्य व देशाच्या विविध भागांतील संस्कृतीत रस निर्माण होतो. शिवाय भारतातील अभिजात भाषांच्या शिक्षणालाही या धोरणात महत्व दिले आहे, याचाही आनंद आहे. भारतात शेकडो भाषा व बोलीभाषांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. जगातील विविध देशांचे नेते मला भेटायला येतात तेव्हा उत्तम इंग्रजी येत असूनही ते आग्रहाने त्यांच्या मातृभाषेतच बोलतात. मातृभाषेत बोलणे ही अभिमान दाखविण्याची बाब आहे. आपल्यालाही आपल्या मुलांमध्ये मातृभाषेचा हा अभिमान रुजवावा लागेल. कोणावरही भाषेची सक्ती करण्यात येणार नाही व कोणत्याही भाषेला विरोध केला जाणार नाही, हेही या धोरणात नमूद आहे. अशा प्रकारचे सर्वंकष शैक्षणिक धोरण ही फार आधीपासूनची गरज होती. आता गरज आहे या धोरणाच्या प्रामाणिक व पूर्णांशाने अंमलबजावणीची. शाळा व वर्गांमध्ये हे परिवर्तन वास्तवात घडवून आणणे ही केंद्र व राज्यांची सामूहिक जबाबदारी आहे. योग्य प्रकारे राबविले गेले तर हे धोरण भारताला जागतिक ज्ञानसत्ता बनवू शकेल. शिक्षणावरील सरकारचा खर्च सध्याच्या जीडीपीच्या ४.३ टक्क्यांवरुन सहा टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरी यासाठी कालमर्यादा ठरवायला हवी, असे मला वाटते. या भविष्यवेधी धोरणाला राज्यांकडूनही मनापासून साथ मिळेल, अशी आशा वाटते.

# पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला गती

## ऑनलाईन प्रवेशाची सुविधा : नावनोंदणीस प्रारंभ; १४ ऑगस्टपर्यंत सुरु राहणार

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शहरातील बहुतांश महाविद्यायांनी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून सुरु केली आहे. बारावीच्या गुणपत्रिका मिळाल्याने या प्रक्रियेची गती वाढली आहे.

बारावीचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतर यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मूळ गुणपत्रिकांचे महाविद्यालयांमध्ये तब्बल १३ दिवसांनंतर वितरण सुरु झाले. त्याचा परिणाम हा पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेवर झाला आहे. जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने दक्षता म्हणून अधिकतर महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा मार्ग निवडला आहे. मूळ गुणपत्रिका मिळेपर्यंत या महाविद्यालयांनी प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांची नावनोंदणीची प्रक्रिया सुरु केली. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून नोंदणी करण्यात आली आहे.

शहरातील न्यू कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रियेत अंतर्गत नावनोंदणीची प्रक्रिया सुरु आहे. डीआरके कॉमर्स कॉलेजमध्ये गुरुवारपासून प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात बारावी, पदवी प्रथम आणि द्वितीय वर्षाचे प्रवेश ऑनलाईन करण्यात येत आहेत. राजाराम महाविद्यालय आणि गोखले कॉलेजमध्ये सोमवारपासून प्रक्रिया सुरु झाली आहे.

कमला कॉलेजमध्ये पदवी प्रवेशासाठी विद्यार्थिनींची नावनोंदणी सुरु आहे. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून, ही प्रक्रिया दि. १४ ऑगस्टपर्यंत सुरु राहणार आहे.



### 'आयटीआय'मध्ये विकल्प सादरीकरण

जिल्ह्यातील शासकीय आणि खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थां (आयटीआय)मध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून सुरु झाली आहे. त्यामध्ये रविवारपासून अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना विकल्प सादर करावयाचे आहेत. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १४ ऑगस्टपर्यंत आहे.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: अपेक्षा शासकतेची




**डॉ. जगदीश जाधव**
jagdishjadhav20@gmail.com
(लेखक राजस्थान केंद्रीय विश्वविद्यालय, अजमेर येथे समाजकार्य विषयाचे अध्यापन करतात)


मागील वर्षी देशातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. के. कस्तुरीरंगन यांनी त्यांच्या समितीच्यावतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०१९' चा मसुदा देशाचे मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. रमेश पोखरीयाल 'निशंक' आणि राज्यमंत्री संजय धोत्रे यांना ३१ मे रोजी सादर केला होता. प्रस्तुत शैक्षणिक धोरणाचे स्वागत आपण तेव्हाही या स्तंभाद्वारे केले होते. (नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: मीमांसा योग्य, अंमलबजावणीची प्रतीक्षा, दि. ११ जून २०१९). मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या (नवीन नाव शिक्षण मंत्रालय) संकेतस्थळावर इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये हा चारशे चौऱ्याऐंशी पानांचा दस्तावेज चिकित्सक सूचनांसाठी उपलब्ध झालेला होता. पहिल्या सहा महिन्यांमध्ये या अहवालावर सुमारे दोन लाख पासष्ट हजार सूचना प्राप्त झाल्या होत्या. देशात अनेक ठिकाणी या अहवालाचे सादरीकरण करून मुक्त चर्चा देखील घडवून आणल्या गेल्या होत्या. प्रस्तुत लेखकाच्या विद्यापीठाच्यावतीने या अहवालावरचा एक परिसंवाद राजस्थान राज्याच्या राजधानीच्या शहरात डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत संपन्न झाला होता. 'इस्रो' या जगद्विख्यात संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष असलेले डॉ. के. कस्तुरीरंगन राजस्थान केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती असल्यामुळे वर्षातून एक-दोन वेळा त्यांचे शिक्षण विषयक चिंतन ऐकण्याचा प्रत्यक्ष योग आम्हा शिक्षकांना मोहरून टाकणारा असतो. अनेक साधक-बाधक चर्चेनंतर तयार झालेला हा अंतिम 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अहवाल २०२०' हा भारत सरकारच्या मंत्री परिषदेने पंतप्रधानांच्या उपस्थितीत २९ जुलै रोजी स्वीकारलेला आहे. गेले काही दिवस, या अहवालाच्या निमित्ताने सर्व प्रकारच्या माध्यमांवर घडणारी चर्चा शैक्षणिक स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक आणि आनंददायी आहे.

मोठे वैविध्य आणि लोकसंख्या असणारा आपला देश, नाही म्हटले तरी, नव्या शैक्षणिक धोरणाला उशिराने सामोरे जात आहे. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काळात लोकसभेमध्ये काँग्रेसचे खासदार सिद्धेश्वर प्रसाद यांनी तत्कालीन शैक्षणिक परिस्थितीमधील विसंगती आणि आव्हाने सभागृहाच्या लक्षात आणून दिल्यावर १९६४ मध्ये पहिल्या शिक्षण आयोगाची स्थापना झाली होती. तत्कालीन विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. दौलतसिंह कोठारी यांच्याच अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या आयोगाने दोनच वर्षात तयार केलेला अहवाल आजही शिक्षणक्षेत्रात मानदंड म्हणून वाचला जातो. महाराष्ट्राचे सुपुत्र जे. पी. नाईक या आयोगाचे सदस्य सचिव होते. त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टीचे आणि अविश्रांत परिश्रमाचे मनोहारी प्रतिबिंब या अहवालात जागोजागी दिसते.



दुसरा शैक्षणिक आयोग हा राजीव गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातला. तत्कालीन शिक्षण मंत्री पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात स्वीकारल्या गेलेल्या या राममूर्ती अहवालात (१९८६) शिक्षण मंत्रालयाचे नाव 'मनुष्यबळ विकास मंत्रालय' असे बदलण्यात आले होते. पुढे नरसिंहराव पंतप्रधान असताना त्यांनी १९९२ मध्ये या धोरणामध्ये जुजबी सुधारणा करून घेतल्या होत्या. १९९१ मध्ये नरसिंहराव आणि डॉ. मनमोहनसिंग या जोडगोळीने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाच्या झंझावातात, गेल्या तीस वर्षात जग आणि भारत, आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या आमूलाग्र बदलांना भिडत आहे. १९८६ नंतरच्या ३४ वर्षात नव्या वेतन आयोगाच्या श्रेणीबाबत आग्रही राहणाऱ्या शिक्षणक्षेत्राने आवश्यक शैक्षणिक बदलांबाबत 'आळी मिळी गुप चिळी' बाळगावी हे खेदजनक आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने पुरस्कृत केलेला बदलाचा वेग मोठ्या गतीने वाढलेला असताना शिक्षणक्षेत्राची कूर्मगती ही विकासाला अवरोधक आहे, अशी मांडणी अनेक स्तरांवर होणे अपेक्षित होते.

प्रस्तुत शैक्षणिक धोरण पुढील १५-२० वर्षांमध्ये शिक्षणक्षेत्राचे मार्गक्रमण दर्शविणारा एक संकल्पित आराखडा आहे. खासगीकरण अंतर्भूत असलेले जागतिकीकरण, दिसामाजी तरुण होत जाणारी लोकसंख्या, तंत्रस्नेही समाज आणि ज्ञानाआधारित अर्थव्यवस्थेचे भान या अहवालामध्ये दिसते. उच्च शिक्षण हा विषय समवर्ती विषय सूचीमधला असल्यामुळे केंद्र आणि राज्य यांनी त्यांच्या व्यवहारात आणि धोरणात टप्प्याटप्प्याने आणावयाचे अपेक्षित बदल या अहवालात अधोरेखित झालेले आहेत. 'केंद्रीकरण' आणि कठोर नियमनांना धोरणात्मक चौकट आखून देणारा दस्तावेज म्हणून त्यावर विधायक टीकाही होऊ शकते. नियमनाबाबत 'लाईट बट टाईट' दृष्टीकोन असायला हवा, ही या अहवालाची रोखठोक भूमिका आहे. गेल्या काही वर्षात शिक्षण विषयक प्राधिकरणे आणि परिषदा ही भ्रष्टाचाराची कुरणे झाली होती. शिक्षण शास्त्र विषयाबाबतच्या घोटाळ्याबाबत न्यायमूर्ती जे. एस. वर्मा आयोगाने (२०१२) 'आपल्या देशातील हजारो शिक्षण संस्था या शिक्षणशास्त्र विषयाची पदवी अक्षरशः विकतात, ही महाविद्यालये तातडीने बंद करायला हवीत' असे स्पष्ट प्रतिपादन केलेले आहे. अशीच परिस्थिती कमी-अधिक फरकाने इतर अभ्यासक्रमांबाबत अस्तित्वात आहे. आपल्या देशात अस्तित्वात असणाऱ्या चाळीस हजार महाविद्यालयांपैकी चाळीस टक्के शिक्षण संस्था या एकल शैक्षणिक कार्यक्रम चालवितात. या एकल शैक्षणिक संस्थांना हळूहळू बहुशाखीय शिक्षणाकडे वळावे लागेल, अन्यथा जवळच्या क्लस्टरमध्ये वर्गीत व्हावे लागेल. आंतरशाखीय, लवचिक, विद्यार्थीकेंद्री अभ्यासक्रम आणि सर्व घटकांची स्वायत्तता हा अहवाल मान्य करतो. पुढील पंधरा वर्षात संलग्निकरणाची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने थांबवत अधिक स्वायत्ततेकडे जाणे, विद्यापीठांनी तीनशेपेक्षा जास्त महाविद्यालयांना संलग्निकीकरण न देता, आवश्यकरित्या राज्यांनी नव्या विद्यापीठांच्या उभारणीकडे वळावे असेही हा अहवाल सांगतो.

गुणवत्तापूर्ण अध्यापन, संशोधन, प्रवर्तन आणि ज्ञाननिर्मिती यांच्यापैकी काहीच एक 'धड' न करणाऱ्या संस्थांची यापुढे 'घडगत' नाही. यापुढील काळात अध्यापन करणारी स्वायत्त पदवी महाविद्यालये, अध्यापन केंद्रीत विद्यापीठे, अध्यापन आणि संशोधन केंद्रीत विद्यापीठे आणि फक्त संशोधन केंद्रीत विद्यापीठे असे वर्गीकरण अस्तित्वात येईल. विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद आणि तत्सम अनेक परिषदांची जागा एकच उच्च शिक्षण आयोग घेईल. शिक्षण विषयक व्यवहारांचे नियमन राष्ट्रीय उच्च शिक्षण नियमन प्राधिकरणाद्वारे होईल. संशोधनाचे अत्याधिक महत्त्व अधोरेखीत करताना 'राष्ट्रीय संशोधन न्यास (एन आर एफ) द्वारे संशोधनाला उत्तेजन दिले जाईल. उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाबाबत आतापावेतो फक्त बोलले जायचे. जगभरातील क्यू. एस. रँकिंग मानांकित पाश्चात्य विद्यापीठांना भारतामध्ये तर भारतामधील विद्यापीठांना इतर देशात आपले कॅम्पस उघडता येणार आहेत. सर्व शिक्षणसंस्थांना दूरस्थ शिक्षणाची पूर्ण मुभा देणारा हा अहवाल पुढील पंधरा वर्षांत विद्यमान स्थूल प्रवेशित निर्देशांक (२६.४) दुपटीपर्यंत नेण्याचा मनसुबा बाळगून आहे. आपल्या देशातील धोरणात्मक अहवाल चांगलेच असतात. राजकीय इच्छाशक्ती, आर्थिक तरतूद, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व बाळगणारी शासकता असल्याशिवाय चांगली धोरणे सत्यात उतरत नाहीत, हा मात्र आतापावेतोचा अनुभव आहे.